# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ११.०५.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १०.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०३ ईसमांवर कारवाई करून ४१,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून ३,०७,२५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१२४ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,५६,७००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस, घातक शस्त्रासह आरोपींना अटक.**

दिनांक १७.०४.२०२६ चे २२.३० वा. ते दिनांक १८.०४.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत, गणेश नगर, भगत कॉलोनी, बुध्द विहार समोर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नामे राज उदय मारवे, वय २१ वर्षे यांनी त्यांची काळ्या रंगाची हिरो स्प्लेंडर दुचाकी क्र. एम.एच. ४९ बि.वाय. ४७३९ किंमती ५०,०००/—रू., ही आपले राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०५ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना गुप्तबातमीदार मार्फतीने माहिती मिळाली की, गमदुर बार चे बाजूला असलेल्या गल्लीमध्ये दोन ईसम शस्त्रासह दुचाकीवर बसून आहेत. अशा प्राप्त माहीतीवरून, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, गमदुर बारचे बाजूचे गल्लीमध्ये पाहणी केली असता, तेथे दोन ईसम संशयीतरित्या बसून कोणाचीतरी वाट बघत असल्याचे दिसून आले. दोन्ही ईसमांना ताब्यात घेवून, त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव क्र. १) मोहम्मद रजा उर्फ माजीत वल्द कादीर अन्सारी, वय २३ वर्षे, २) मयसर जमाल वल्द सगीर अहेमद अन्सारी, वय २५ वर्षे दोन्ही रा. टेका, नवीन वस्ती, पाचपावली, नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष त्यांची अंगझडती व त्यांच्या ताब्यातील दुचाकीची झडती घेतली असता, वाहनाचे डिक्कीत एक धारदार लोखंडी चाकू किंमती १,०००/—रू. चा मिळून आला. आरोपींना त्यांचे जवळील दुचाकी वाहनाबाबत विचारणा केली असता, त्यांनी

संगणमताने पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतुन वाहनचोरी केल्याची कबूली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन क्र. एम.एच. ४९ बि.वाय. ४७३९, एक धारदार लोखंडी चाकू, एक रेडमी कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण किंमती ६६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. दोन्ही आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पथकाचे पोनि. विनायक गोल्हे, व त्यांचे पथकाने केली.



**<u>३) जुनी कामठी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक १०.०५.२०२६ चे २०.१५ वा. ते २०.४५ चे दरम्यान, जुनी कामठी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, ईमलीबाग, कलीम कबाडीचे दुकान जवळ, कामठी, नागपुर येथे एक ईसम पोलीसांना पाहुन पळून जाताना दिसुन आल्याने, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद शाहीद मोहम्मद इजाज अन्सारी, वय ४५ वर्षे, रा. वारीसपूरा, लाल मदरसा चौक, कामठी, जि. नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२६, दिनांक २२.०४.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतील पो. ठाणे पारशिवणी, खापा, सावनेर, कळमेश्वर, कन्हान, मौदा व कुही हद्दीतून ०६ महीन्याकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे जुनी कामठी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग), वपोनि. श्री प्रशांत जुमडे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. मनिष हिवरकर, पोउपनि. मिलींद मेश्राम, पोहवा. मधूकर निखाडे व पोअं. विनोद बल्की यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे पारडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ११.०५.२०२६ चे ०२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी येथील बिटमार्शल हे पोलीस ठाणे हद्दीतील नागपूर—भंडारा हायवे, कापसी एजन्सी परिसरात रात्रगस्त पेट्रोलिंग करीत असता, त्यांना दोन जागरूक नागरीकांनी माहिती दिली की, हरी ढाब्याजवळील रोडलगत एक ईसम जखमी बेशुध्द अवस्थेत पडून आहे. अशा प्राप्त माहितीवरून बिटमार्शल यांनी घटनास्थळी जावून पाहणी केली असता, तेथे एक ईसम जखमी

जखमी बेशुध्द अवस्थेत दिसून आला. कोणीतरी अज्ञात वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन त्यांना धडक देवुन, गंभीर जखमी करून पळून गेला. जखमी बेशुध्द ईसमाचे नांव विरेंद्र राजभान कुशवाह, वय ४८ वर्षे, रा. गुलमोहर नगर, कळमना, नागपूर असे असुन, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉसपीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोहवा. धिरज पाली यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. सचिन ठाकरे ८२०८५६९८२३ यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा. न्या.सं., सहकलम १३४(अ)(ब), १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कपिलनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०९.०५.२०२६ चे १०.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत, प्लॉट नं. १५४, नाका नं. ०२, रजा टाऊन, नागपुर येथे राहणारे फिर्यादी श्रीमती रोशनी राहुल राजपूत, वय २८ वर्षे ह्या तसेच त्यांचे पती आपले राहते घराला कुलुप लावुन, जॉब करीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ३,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,३४,८००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपिलनगर येथे पोउपनि. रणजित रणनवरे ८८०५५७२०६९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**